# कलियुगातील द्रष्टे ऋषि !

# योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन

## (गुणवैशिष्ट्ये, कार्य, सिद्धी आणि देहत्याग)

## विषयसूची


卐 योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचे हिमालयवासी सद्‌गुरु प.पू. आनंदस्वामीजी ! ५

卐 एकमेवाद्वितीय योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम ! ७

卐 भक्तवत्सल आणि कृपासिंधू योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या चरणी कोटीशः कृतज्ञता ! १०

卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय १३


---

## अनुक्रमणिका


१. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या जन्माचा पूर्व-इतिहास, त्यांची साधनेतील वाटचाल आणि त्यांनी केलेल्या खडतर साधना १५

२. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांची साधी आणि सात्त्विक जीवनशैली २४

३. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचे विविध गुण २५

४. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांची विविध वैशिष्ट्ये ३४

५. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचे कुटुंबीय आणि त्यांची काही वैशिष्ट्ये, तसेच त्यांनी योगतज्ञ दादाजींविषयी व्यक्त केलेले हृद्‌गत ! ४६

६. योगतज्ञ दादाजी यांना प्राप्त झालेल्या काही प्रमुख सिद्धी ५०

७. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांची ‘भविष्यकथन सिद्धि’ आणि त्यांनी लिहिलेली वैशिष्ट्यपूर्ण भाकिते ६७

८. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचे अद्वितीय कार्य ८७

९. योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचा ‘ॐ आनंदं हिमालयं’ संप्रदाय आणि त्याचा प्रमुख दैवी मंत्र (प्रार्थना) ! १०१

# योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांचे हिमालयवासी सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजी !

**१. हिमालयातील खोल गुहेमध्ये ध्यानमग्न स्थितीत ईश्वरी कार्य करणारे सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजी ! :** 'अत्यंत तेजःपुंज असलेले माझे सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजी हे काश्मिरी ब्राह्मण असून ब्रह्मचारी आहेत. ते उच्चविद्याविभूषित आहेत. ते दर्शनी मंडळींना वयोवृद्ध होत नसल्याचे दिसते. हिमालयातील कुलू खोऱ्यामध्ये विविध संप्रदायांचे ऋषिमुनी अदृश्य परिसरातील भिन्न गुहांमध्ये वास्तव्य करत आहेत. अशाच खडतर अशा परिसरामधील खोल गुहेत ध्यानमग्न स्थितीत सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजींचे वास्तव्य असते. ते ईश्वरी कार्यही करत असतात.'
– योगतज्ञ दादाजी वैशंपायन, कल्याण, जिल्हा ठाणे.

**२. सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजी यांचे साधकांना घडलेले तेजरूपातील दिव्य दर्शन ! :** 'सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजी १५ वर्षांच्या समाधी अवस्थेमधून प्रगट होतांना प्रतिविष्णुस्वरूप होऊन सूर्याप्रमाणे प्रखर तेज:पुंज झाले. त्यांचे साधकांना दर्शन होण्याची शक्यताच नव्हती; म्हणून 'त्यांच्या तेजाचे तरी दर्शन व्हावे', अशी इच्छा काही ज्येष्ठ प्रगतीपर साधकांनी केली. साधकांचे म्हणणे होते की, 'सूर्य उगवला की, चराचर सृष्टीवर त्याचा प्रकाश पडतो. मग या विष्णुस्वरूपी सद्गुरूंचे प्रकाशदर्शन वानगीदाखल तरी व्हावे', अशी मनोमनी तळमळ आहे. 'आमची पात्रता नाही', हे मान्य आहे; पण अशी काही शुभ घटना घडली, तर साधनेसाठी अधिक उत्साह वाटेल.' साधक असे आवर्जून सांगत राहिले. मग मात्र एका शुभदिनी घराच्या तिसऱ्या मजल्यावर (कल्याण येथे योगतज्ञ दादाजींच्या वास्तूमध्ये) योग्य जागा निवडून श्रद्धावंत उपासक, तसेच डोळस आणि अतिचिकित्सक साधक अशा बऱ्याच मंडळींना 'हॉल'मध्ये एकत्र बसवण्यात आले. त्यांच्याकडून शुद्धतेने मंत्रघोष साडेचार घंटे (तास) चालू ठेवला. 'सिद्धी'चे प्रात्यक्षिक स्वतः दिव्यशक्तीच दाखवणार; म्हणून त्यांनी घरातील आणि रस्त्यावरचे सर्व दिवे बंद केले अन्

चोहीकडून गडद अंधार झाला. त्यानंतर साधारणपणे १० मिनिटांनी विजेसारखा; पण सप्तरंगी नेत्रदीपक आणि पौर्णिमेच्या चंद्राच्या आकाराचा प्रकाशझोत खिडकीतून आतमध्ये आला अन् तेवढी सर्वच जागा पूर्ण प्रकाशमय झाली. हा दैदीप्यमान प्रकाश सहजपणे डोळ्यांनी पहाणे अशक्य झाल्याने सर्वांनी डोळ्यांची उघडझाप करत दर्शन घेतले. नंतर ते तेज अंतर्धान पावले. त्यानंतर लगेचच घरातील आणि रस्त्यावरील दिवे पुन्हा आपोआप चालू झाले. काही वाचकांना ही काल्पनिक घटना वाटेल; पण या प्रसंगाचा प्रत्यक्ष अनुभव घेणारी मंडळी अजूनही त्या आठवणीने आनंदी होतात. अशा स्वरूपाचे दिव्य दर्शन सद्गुरु प.पू. आनंदस्वामीजी यांनी योग्य दिवशी ठाणे, दादर आणि पुणे येथील काही साधकांच्या वास्तूंमध्येही घडवले.' (योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या 'आकाशवाणी'द्वारे २१.७.२००२ या दिवशी प्रसारित झालेल्या मुलाखतीवरून) F (५७ ई १ + ५७ नि + PStDV + PR 42S-A)

## सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावांआधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टीवाचनाद्वारे सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. सप्तर्षींच्या आज्ञेनुसार १३.५.२०२० या दिवसापासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ' असे संबोधले जात आहे.

**'गुरूंचे मन कसे जिंकावे ?', याविषयी मार्गदर्शन करणारा सनातनचा ग्रंथ !**



### आदर्श शिष्य कसे बनावे ?

- शिष्य आणि विद्यार्थी यांत कोणता भेद आहे ?
- शिष्य होण्यासाठी कोणते गुण अंगी बाणवावेत ?
- गुरूंचे मन जिंकण्यासाठी कसे आचरण ठेवावे ?

# एकमेवाद्वितीय योगतज्ज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम !

## योगतज्ज्ञ दादाजी : कलियुगातील थोर ऋषि !



'प्राचीन काळी ऋषिमुनींनी केलेले खडतर तप, त्यांचे द्रष्टेपण, सर्वज्ञता, लीलासामर्थ्य, वैराग्यशीलता इत्यादींविषयी आपल्याला ऐकून ठाऊक असते. कलियुगात असे कोणी असू शकेल, याची कल्पना आपण करू शकत नाही. मात्र कलियुगात होऊन गेलेले असे एकमेवाद्वितीय व्यक्तीमत्त्व म्हणजे, योगतज्ज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन !

योगतज्ज्ञ दादाजींनी अत्यंत कष्टप्रद साधना केल्यामुळे त्यांना अनेक सिद्धी प्राप्त होत्या. मोठमोठे योगीजन सिद्धींच्या मोहात अडकतात; पण योगतज्ज्ञ दादाजींनी या सिद्धींचा दुरुपयोग कधीच केला नाही. 'लक्ष्मीसिद्धी'मुळे त्यांच्या हातात पैसा सहजपणे खुळखुळू शकत असतांनाही ते आयुष्यभर अत्यंत साधेपणाने राहिले. 'भविष्यकथनसिद्धी'मुळे त्यांनी अनेक भाकिते आधीच केली आणि ती नंतर तंतोतंत खरी ठरली. यामुळे ते प्रसिद्धीच्या उच्च आसनावर विराजमान असतांनाही नेहमीच संन्यस्ताप्रमाणे जीवन जगले. 'दीन-दुःखीजनांच्या अडचणी सोडवून त्यांना अध्यात्माच्या मार्गावर आणता यावे', यासाठीच त्यांनी सिद्धींचा उपयोग केला ! किंबहुना 'निःस्वार्थी भावाने जनकल्याणासाठी समर्पित जीवन !', अशीच त्यांच्या जीवनाची व्याख्या करता येते. त्यांच्या तपस्वी व्यक्तीमत्त्वाचे आणि लोकोत्तर कार्याचे अनेक पैलू प्रस्तुत ग्रंथात उलगडून दाखवले आहेत.

## सनातनवर सतत कृपाछत्र धरणारे योगतज्ज्ञ दादाजी !

माझ्या गुरूंच्या देहत्यागानंतर काही काळाने माझी योगतज्ज्ञ दादाजींशी भेट झाली आणि नंतर त्यांच्याशी जे ऋणानुबंध जुळले, ते

सदाचेच ! या योगे देवाने मला गुरूंची उणीव भासू दिली नाही.

गेली १५ वर्षे माझे महामृत्यूयोग टळावेत, सनातनच्या साधकांवर होणारी वाईट शक्तींची आक्रमणे दूर व्हावीत, सनातनचे सर्व संकटांपासून रक्षण व्हावे आणि ईश्वरी राज्याच्या (हिंदु राष्ट्राच्या) स्थापनेतील अडथळे दूर व्हावेत, यांसाठी योगतज्ञ दादाजींनी अखेरच्या श्वासापर्यंत अनुष्ठाने, जप-तप इत्यादी केले.

वर्ष २०१३ मध्ये योगतज्ञ दादाजींनी मला सांगितले, ‘‘आता मला दैवी शक्तींनी माझी इहलोकीची यात्रा समाप्त करण्याची आज्ञा केली आहे. त्यामुळे आता मला देहत्याग करावा लागेल.’’ त्यावर मी योगतज्ञ दादाजींना म्हटले, ‘‘तुमच्यानंतर आमचे रक्षण कोण करणार ? आम्ही कोणाला उपाय विचारायचे ?’’ त्यावर त्यांनी थोडा विचार करून सांगितले, ‘‘सध्या तसा पृथ्वीवर दुसरा कोणी नाही. दैवी शक्तींना सांगून मीच माझे आयुष्य तुमच्यासाठी वाढवून घेतो.’’ या एका प्रसंगावरूनही योगतज्ञ दादाजींची सनातनवर असलेली अपरंपार प्रीती आणि त्यांचा अध्यात्मातील असामान्य अधिकार लक्षात येतो.

योगतज्ञ दादाजी यांच्यासारख्या उच्च कोटीच्या संतांचे कार्य निर्गुणातूनही चालूच असते. त्यामुळे ‘आज योगतज्ञ दादाजी स्थुलातून जरी नसले, तरी निर्गुणातून ते आमच्या पाठीशी आहेतच’, अशी आमची दृढ श्रद्धा आहे.

## कृतज्ञता आणि प्रार्थना !

थोडक्यात योगतज्ञ दादाजींमुळेच मी आणि ‘सनातन संस्था’ अजून जिवंत अन् कार्यरत आहोत. त्यांचे हे ऋण काय आम्हाला फेडता येईल ? केवळ अशक्य ! यामुळे अंतःकरणात त्यांच्याविषयी हेच शब्द उमटतात, ‘कृतज्ञता...कृतज्ञता...कृतज्ञता !’ मी योगतज्ञ दादाजींच्या चरणी इतकीच प्रार्थना करू शकतो, ‘आपल्या कृपेचे छत्र आमच्यावर सदोदित राहू दे.’

**‘प्रस्तुत ग्रंथाच्या माध्यमातून योगतज्ञ दादाजींच्या अलौकिक कीर्तीचा सुगंध सर्वदूर दरवळावा आणि सर्वांच्याच अंतःकरणात त्यांच्याविषयी दृढ श्रद्धा अन् भक्ती निर्माण व्हावी’, अशी ईश्वरचरणी प्रार्थनाही करतो.**

## योगतज्ञ दादाजींच्या चरणी ग्रंथ अर्पण !



प्रस्तुत ग्रंथ हा योगतज्ञ दादाजींच्या कृपेमुळे आणि त्यांच्या अव्यक्त संकल्पानेच प्रकाशित होत आहे. यासाठी हा ग्रंथ त्यांच्या चरणी अर्पण !’

**– डॉ. जयंत बाळाजी आठवले (१६.३.२०२१)**

## योगतज्ञ दादाजींनी कमी अवधीत तयार केलेला उत्तम शिष्य म्हणजे श्री. अतुल पवार !

‘योगतज्ञ दादाजींनी त्यांच्या सेवेसाठी एका साधकाला त्यांच्याकडे पाठवण्यास मला सांगितले. तेव्हा ‘त्यांची चांगल्या प्रकारे सेवा करू शकेल, असा कोण आहे ?’, असा विचार माझ्या मनात आला आणि श्री. अतुल पवार याचे नाव पटकन सुचले; म्हणून मी अतुलला त्यांच्याकडे पाठवले. त्याने योगतज्ञ दादाजींची इतकी अप्रतिम सेवा केली की, ते त्याचे माझ्याकडे नेहमी कौतुक करायचे. त्याने केलेली अप्रतिम सेवा केवळ योगतज्ञ दादाजींच्या शिकवणीमुळेच त्याला करता आली. एका उत्कृष्ट शिष्याला तयार केल्याबद्दल मी योगतज्ञ दादाजींच्या चरणी कोटीशः कृतज्ञ आहे.’ – **(परात्पर गुरु) डॉ. आठवले** F (PStDV-Te + 21A-AKP-L + DrV-Kou-Sa + DrV-Kou-St + PR 42Vai) (29.4.2020)